क्र.मासं/रवका/न.क्र.५६९/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

**महावितरण**
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**

दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ४७८ दिनांक ०१ / ०२ / २०१४

विषय : म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील कर्मचाऱ्यांना दि.०१ जुलै २०१३ ते दि.३० सप्टेंबर २०१३ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम अदा करण्याबाबत.

वाचा : १) सा.आ.क्र.११७ (क) दिनांक ३१.३.१९८६
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.४७१ दि.१०.१०.२०१३.

......

महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग क्र.मभवा-१११३/प्र.क्र.१८/सेवा-९, दिनांक ०८.१०.२०१३ अनुसार वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या ९० % या दराने महागाई भत्ता म.रा.वि.वितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना प्रशासकीय परिपत्रक क्र.४७१ दि.१०.१०.२०१३ अनुसार दि.०१.०७.२०१३ पासून लागू करण्यात आला असून वाढीव महागाई भत्त्याची रक्कम दिनांक ०१.१०.२०१३ पासून अदा करण्यात येत आहे.

२. आता राज्य शासनाच्या वित्त विभागाने शासन निर्णय क्र.मभवा-१११३/प्र.क्र.१८/सेवा-९ दि.२३.०१.२०१४ अन्वये राज्य शासकीय व इतर कर्मचारी तसेच ज्यांना महागाई भत्ता अनुज्ञेय आहे अशा सर्व पूर्णकालीक कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जुलै २०१३ ते दि.३० सप्टेंबर २०१३ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम देण्यात यावी असे आदेश दिले आहेत.

३. शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जुलै २०१३ ते दि.३० सप्टेंबर २०१३ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम देण्याबाबत व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन) आणि संचालक (प्रकल्प) यांच्याशी विचार विनिमय करुन मंजुरी प्रदान केली आहे.

४. परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे माहे जुलै २०१३ ते सप्टेंबर २०१३ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना माहे फेब्रुवारी २०१४ च्या वेतनामध्ये समाविष्ट करुन देण्यात यावी.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या इंट्रानेट (R-APDRP Portal) वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**( संदेश हाके )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\D.A-Adm.Circula*